# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०२० /२०१०

अर्जदार : श्री अनिल किसन गायकवाड
रा. कानफाडेनगर, साई मंदीर जवळ,
वर्धा रोड,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
कॉग्रेसनगर विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती :

1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्री डी. जी. गावनार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

–– आदेश ––

पारीत दि. २३.०३.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक १६.०२.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

सदर तक्रार अर्ज अनिल किसन गायकवाड यांनी नविन विद्युत पुरवठा मिळण्याकरिता केलेला आहे. तक्रार कर्ता हा राहणार प्लॉट क्रं. ६० कानफाडेनगर, वर्धा रोड, नागपूर येथे राहत आहे. सदर घर त्याचा भाऊ अशोक किसन गायकवाड याचे नावाने आहे. तक्रार कर्त्याने विद्युत मिटर क्रं. ४०२९४६ दि. ०४.१०.१९७८ संयुक्तपणे त्याचा भाऊ अशोक गायकवाड याचे सोबत वापरत होता. परंतु त्याचा भावाने सदर विद्युत मिटर आपल्या वहीवाटी बसविल्यामुळे तक्रार कर्त्यास विद्युत पुरवठा मिळत नाही. तक्रार कर्त्याने नविन विज पुरवठा मिळण्याकरिता अर्ज केलेला आहे. परंतु त्यास नविन विज पुरवठा देण्यात आलेला नाही. तक्रारकर्त्याने नविन विज पुरवठा देण्याची विनंती केली आहे.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत म्हणणे दि. ११.०३.२०१० ला दाखल केले त्यांचे असे म्हणणे आहे की तक्रारकर्ता राहत असलेले घर त्याचा भावाचे नावाने असुन सदर जागेबददल न्यायालयात वाद सुरू आहे, सदर घराचा मालक हा अशोक गायकवाड गैरअर्जदाराचा अधिकृत ग्राहक असुन त्याला स्वंत्रत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक आहे. सदर घर हे तक्रारकर्त्याच्या मालकीचे नसुन घर मालकाने विद्युत पुरवठा देण्याकरिता लेखी आक्षेप घेतला आहे. अर्जदाराने त्या कायदेशीर हक्का बाबत कागदपत्र दाखल केलेले नाही. श्री अशोक गायकवाड याने सदर घर विक्रीचा करार केलेला आहे व त्या संदर्भात दिवाणीदावा सुरू आहे. गैरअर्जदाराच्या मते वरील मुद्दयाच्या आधारे तक्रार कर्त्यास विद्युत पुरवठा देता येणार नाही.

गैरअर्जदाराने विद्युत पुरवठा देण्यास उशिर केलेला नसुन सदर तक्रार खारीज करण्यात यावी ही विनंती केलेली आहे.

मंचाने दोन्ही पक्षकाराचे म्हणणे एकुण घेतले.

गैरअर्जदाराच्या मते तक्रारकर्ता राहत असलेले घर भावाच्या मालकीचे असुन नविन विद्युत मिटर देण्यास घर मालकाने आक्षेप घेतलेला

आहे. तसेच तक्रार कर्त्याने त्याचा कायदेशीर ताब्याबदद्ल कागदपत्र दाखल केलेले नाही.

तक्रार कर्त्याने मुळ विद्युत पुरवठा मागणीच्या अर्जासोबत तसेच अनेक कागदपत्र दाखल केले आहे. त्याने रेशन कार्डाची नक्कल, निवडणुक आयोगाचे ओळखपत्राची नक्कल, वाहन चालक परवान्याची नक्कल तसेच तक्रारकर्ता अनिल किसन गायकवाड हयांच्या दोन भगिनींनी देखील संमतीपत्र दिले आहे. अनुक्रमे सौ. सिंधु देवराव काळे, येमुबाई चाहांदे तसेच विशेष कार्यकारी अधिकारी श्री कानफाडे यांनी दिलेले प्रमाणपत्र हया सर्व कागदपत्रावरून तक्रारकर्ता हा सुमारे ४० वर्षापासुन प्लॉट क्रं. ६० कानफाडे नगर येथे राहत असल्याचे स्पष्ट होते तसेच सदर घर आधी तक्रारकर्त्याच्या वडीलाचे नांवे होते हयावरून तक्रारकर्ता हा गेले ४० वर्षा पासुन राहत आहे हे सिध्द होते.

रेकार्डवर असलेल्या कागदपत्रावरून तक्रारकर्ता राहत असलेल्या घरा संबधी वाद असल्याचे स्पष्ट दिसुन येते, तक्रारकर्त्याचा भाऊ श्री अशोक गायकवाड मालक असल्याचे दिसुन येते.

सदर घर मालकीचा मुद्या दिवाणी न्यायालयात विचाराधीन आहे तेव्हा घराचा मालकीहक्काचा विचार गैरअर्जदारास कर्ता येणार नाही.

तक्रार कर्त्याने आपले प्रतिज्ञापत्र गैरअर्जदारास सादर केलेले आहे. त्यात त्याने स्पष्ट पणे म्हटले आहे की त्याने दिवाणी दाव्याचा निकाल त्याचे विरूदध गेल्यास विद्युत मिटर काढण्यास त्याची हरकत राहणार नाही.

दोन्ही पक्षाचे म्हणणे एकुण घेतल्यावर असे स्पष्ट दिसुन येते की, तक्रारकर्त्या हा गेल्या ४० वर्षापासुन राहत आहे. सदर घर तक्रार कर्त्याच्या वडीलांचे नांवे होते तेव्हा वरील सर्व मुद्याचा विचार केल्यावर मानवी हक्काचा विचार केल्यावर विद्युत पुरवठया पासुन वंचित ठेवणे योग्य होणार नाही.

गैरअर्जदाराने विद्युत पुरवठा न देण्यास दिलेली कारणे समाधान कारक वाटत नाही.

# <u>निर्णय</u>

सदर अर्ज अशंतः मंजुर करण्यात येत असुन अर्जदाराने दिलेल्या दिनांक 29.01.2010 च्या शपथपत्राचा विचार करून अर्जदारास नविन विज पुरवठा देण्यात यावा.

गैरअर्जदारास आदेश देण्यात येतो की, नविन विद्युत पुरवठा दिल्यानंतर आदेश पारीत केल्यानंतर 30 दिवसाचे आत तसा अहवाल हया कार्यालयात पाठविण्यात यावा.

| सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|
| (डी.जी. गावनार) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या | सभापती |

ग्राहक गा–हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

सभापती

ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.श.प.)

म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर